सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा अंतर्गत येणा-या पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील कर्मचा-याचा जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार आरोग्य दर्शकाचा तुलनात्मक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत शारीरिक शिक्षण विषयातील विद्यावाच्यस्पती या पदवीसाठी सादर केलेली संशोधन रुपरेषा

संशोधक

आण्णा दिलीप मोहिते

मार्गदर्शक

डॉ. प्रदीप देशमुख

संशोधन केंद्र

शिक्षण शास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

प्रस्तावना

आजच्या काळात आरोग्य ही सर्वसामान्यबाब आहे. प्रत्यकाची आरोग्यबद्दलची आगळी वेगळी संकल्पना असते. परंतु सध्याच्या आधुनिक यांत्रिक संगणकीय युगात आरोग्याकडे दुर्लक्ष होते. जो पर्यत व्यक्तीला शारीरिक समस्या निर्माण होत नाही. तो पर्यत शारीरिक ,मानसिक स्वास्थ्याचे मुलतत्व आहार याकडे लक्ष दिले जात नाही. समाजात पसरत असलेले विविध शारीरिक व मानसिक आजार, व्याधी, व्यवहार यावरुन सहज स्पष्ट होते. जसा माणसाचा आहार तसे त्याचे आचार विचार आणि आरोग्य, आरोग्याची अत्यंत आवश्यकता आहे हे विविध अभ्यासांद्वारे सिध्द झालेले आहे आणि म्हणूनच उत्तम आरोग्य हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे.

आरोग्य ही व्यक्तीची स्वाभाविक स्थिती आहे केवळ रोगापासुन मुक्तता म्हणजेच आरोग्य नाही . कुशल शारीरिक व मानसिक आणि सामाजिक स्थिती यांचा सुध्दा आरोग्यात अंतर्भाव केला गेला आहे.

आरोग्य

केवळ रोगांचा अभाव असणे म्हणजे आरोग्य नाही तर व्यक्तीचे शारीरिक मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्य असणे म्हणजे आरोग्य. (जागतिक आरोग्य संघटना)

शरीर मन किंवा आत्मा यांची सुस्थिती आणि शारीरिक आजार / रोग /दु:ख /वेदना व्याधींपासुन मुक्तता म्हणजे आरोग्य होय.

आरोग्य कल्पना सर्वांगीण आहे. तिचा संबध हा रोग नसण्याशी आहे प्रत्येक समाजाची आरोग्य बद्दलची आपली स्वत: ची संकल्पना असते. परंतु सध्याच्या आधुनिक, यांत्रिक संगणकीय युगात आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे समाजात पसरलेले विविध शारिरिक व मानसिक आजार, व्याधी, व्यवहार यावरुन सहज स्पष्ट होते. जीवनासाठी उत्तम आरोग्याची अत्यंत आवश्यकता आहे हे विधान अभ्यासाद्वारे सिध्द झालेले आहे. आणि म्हणूनच उत्तम आरोग्य संपदा हा प्रत्येकाचा मुलभूत हक्क आहे हे सयुक्त राष्ट्र संघ (United National Organization) आणि जागतिक आरोग्य संघटना (WHO) या दोघांनीही मान्य केले आहे, आरोग्य ही व्यक्तीची स्वाभाविक स्थिती

आहे, केवळ रोगांपासून मुक्तता म्हणजे आरोग्य नाही. तर उत्तम शारीरिक मानसिक आणि सामाजिक स्थिती यांचा सुद्धा आरोग्यात अतर्भाव आहे, शारीरिक हालचाल. मादक पदार्थ, मानसिक आरोग्य, स्वच्छता यामुळे मुलांचे अनारोग्याचे प्रमाण वाढत आहे. तसेच शारीरिक दृष्ट्या चपळ नसणे, खाण्याच्या वाईट सवयी, तंबाखू सेवन, सिगारेट सेवन, ही सुद्धा अनारोग्याचे प्रमुख कारणे आहेत. तसेच महाविदयालयाला आरोग्य विषय जाणीव करुन देणे गरजेचे आहे. त्यामुळे ह्या सर्व समस्या लक्षात घेऊन संशोधकाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत येणा-या पुणे शहरातील व पुणे ग्रामीण मधील महाविद्यालयातील आरोग्य दर्शकाचा तुलनात्मक अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे जागतीक आरोग्य संघटनेने भविष्यात होऊ शकणा-या गोष्टीच्या कल्पनेतून अंदाजातुन आरोग्याची विशिष्ट परिणामे सांगितले आहे.

आरोग्य दर्शक

१) आरोग्य, आणि पर्यावरण सुरक्षितता (Health & safety policies & Environment)

२) आहारातील आचरण (Dietary behaviours)

३) स्वच्छता (Hygiene)

४) मानसिक आरोग्य (Mental Health)

५) शारीरिक शिक्षण आणि इतर शारीरिक हालचाल कार्यक्रम (Physical Ed & Other Physical Activity Programes)

६) कौटुबिक आणि सामाजिक सहभाग (Family Community Involvement)

७) संरक्षण (Protective Factors)

आरोग्याची समस्या

व्यायामाचा अभाव अवेळी खांण शारीरिक हालचाल. मादक पदार्थ, मानसिक आरोग्य, स्वच्छता, यामुळे मुलांच अनारोग्याचे प्रमाण वाढत आहे. तसेच शारीरिक दृष्ट्या चपळ नसणे, खाण्याच्या वाईट सवयी, तंबाखू सेवन, सिगारेट सेवन, ही सुद्धा अनारोग्याचे प्रमुख कारणे आहेत. यामुळे महाविद्यालयात आरोग्याबद्दल जनजागृती करतात की नाही, चांगल्या सवयी आहेत कि नाही. महाविद्यालयातील आरोग्य आणि पर्यावरण सुरक्षितता, आहारातील आचरण, स्वच्छत, मानसिक आरोग्य शारीरिक शिक्षण आणि इतर शारीरिक हालचाल कार्यक्रम, कौटुबिक आणि सामाजिक सहभाग, संरक्षण, या सुविधा पुरवितात का नाहीत हे पाहणे गरजेचे आहे.त्याचप्रमाणे शहरातील व ग्रामीण महाविद्यालयामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगा मार्फत ज्या सुविधा पुरविल्या जातात त्याचा योग्य फायदा घेतात का त्या कशा प्रकारे देतात हे तपासण्यासाठी ह्या सर्व समस्या लक्षात घेऊन संशोधकाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत येणा-या पुणे शहरातील व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील आरोग्य दर्शकाचा तुलनात्मक अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे.

गरज व महत्त्व

१) महाविद्यालयातील आरोग्य दर्जा कसा आहे हे संस्थेला व विद्यापीठाला माहीत असणे गरजेचे आहे.

२) पुणे शहरातील महाविद्यालयामध्ये आरोग्य,आणि पर्यावरण सुरक्षितता,आहारातील आचरण, स्वच्छता, मानसिक आरोग्य, शारीरिक शिक्षण आणि इतर शारीरिक हालचाल कार्यक्रम, कौटुबिक आणि सामाजिक सहभाग, संरक्षण, या सुविधा महाविद्यालयात पुरवल्या जातात का हे पाहणं गरजेचे आहे.

३) पुणे ग्रामीण महाविद्यालयात आरोग्य आणि पर्यावरण सुरक्षितता, आहारातील आचरण, स्वच्छता, मानसिक आरोग्य, शारीरिक शिक्षण आणि इतर शारीरिक हालचाल कार्यक्रम, कौटुबिक आणि सामाजिक सहभाग, संरक्षण, या सुविधा महाविद्यालयात पुरवल्या जातात का हे पाहणं गरजेचे आहे.

४) महाविद्यालयातील सद्यास्थिती कळेल व आरोग्य दर्शकानुसार कोणती सुविधा नसेल तर त्याची शिफारस विद्यार्थी पालकांना, संस्था चालकांना व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आरोग्य विभागाला शिफारस करण्यात येईल.

५) सदर संशोधनामुळे महाविद्यालयातील धोरणाविषयी / कार्यक्रम सुधारण्यास उपयोग होईल.

६) सदर संशोधनामुळे महाविद्यालयातील कमतरता व मजबुतपणा समजुन येइल, त्यामुळे आरोग्याच्या बाबतीत कोणते उपक्रम राबवायचे व त्याची काळजी कशी घ्यायची हे समजेल.

कार्यात्मक व्याख्या -

१) महाविद्यालयीन आरोग्य दर्शक - आरोग्य माहीती दर्शक प्रश्नावलीच्या माध्यमातुन मिळालेले गुण म्हणजे महाविद्यालयीन आरोग्य माहीती दर्शक होय.

संशोधनाची उद्दिष्टे

१) महाविद्यालयातील प्राचार्य, अरोग्य कमिटी चा प्रमुख व शारीरिक शिक्षण संचालक याच्या कडून जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार असलेली आरोग्य दर्शक प्रश्नावली भरुन घेणे.

२) प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील आरोग्य दर्शकाची तुलना करणे.

शुन्यपरिकल्पना – (H_o)

$H_{०१}$: पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील आरोग्य आणि पर्यावरण सुरक्षितता यांमध्ये सार्थक फरक आढळुन येणार नाही.

$H_{०२}$: पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील आहारातील आचरण मध्ये सार्थक फरक आढळून येणार नाही.

$H_{०३}$: पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील स्वच्छता मध्ये सार्थक फरक आढळून येणार नाही.

$H_{०४}$: पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील मानसिक आरोग्या मध्ये सार्थक फरक आढळून येणार नाही.

$H_{०५}$: पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण आणि इतर शारीरिक हालचाल कार्यक्रम यांमध्ये सार्थक फरक आढळून येणार नाही.

$H_{०६}$: पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील कौटुबिक आणि सामाजिक सहभाग यांमध्ये सार्थक फरक आढळून येणार नाही.

$H_{०७}$: पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील संरक्षण यांमध्ये सार्थक फरक आढळून येणार नाही.

$H_{०८}$: पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालयातील आरोग्य दर्शक यांमध्ये सार्थक फरक आढळून येणार नाही.

मर्यादा

१) संशोधनासाठी घेतलेली जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार आसलेली आरोग्य दर्शक प्रश्नावली ही इग्लिश मध्येच असेल.
२) प्राचार्य, अरोग्य कमिटी चा प्रमुख व शारीरिक शिक्षण संचालक यांनी दिलेली माहीती सत्य मानली जाणार आहे.
३) संशोधक हे सद्यस्थिती पडताळून पाहणार नाही त्यामुळे ही सदर संशोधनाची मर्यादा असेल.

स्वयंमर्यादा

१)सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न असलेले पुणे शहरातील व पुणे ग्रामीण मधील पदवी शिक्षण महाविद्यालये पुरतेच मर्यादीत असेल.

२) सदर संशोधन ची व्याप्ती महाराष्ट्र राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेली पुणे शहर व पुणे ग्रामीण महाविद्यालया पुरतीच मर्यादित आहे.

गृहीतके

१) सदर संशोधनासाठी संस्था चालक व प्राचार्य परवानगी देतील.
२) सदर संशोधनासाठी महाविद्यालयातील प्राचार्य, अरोग्य कमिटी चा प्रमुख व शारीरिक शिक्षण संचालक प्रश्नावली प्रमाणिक पणे भरुन देतील.

संशोधन पध्दती –

प्रस्तुत संशोधनात संशोधक तुलनात्मक सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल.

जनसंख्या – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न असलेल्या पुणे शहरातील ७१ महाविद्यालय व पुणे ग्रामीण मधील १०२ महाविद्यालयातील प्राचार्य, अरोग्य कमिटी प्रमुख व शारीरिक शिक्षण संचालक ही सदर संशोधनाची जनसख्या असेल.

न्यादर्श –सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न असलेल्या पुणे शहरातील ५७ व पुणे ग्रामीण मधील ८२ महाविद्यालयातील प्राचार्य, अरोग्य कमिटी प्रमुख व शारीरिक शिक्षण संचालक ही न्यादर्श आसेल.

संशोधनाची साधने -

सदर संशोधनाची माहीती संकलित करण्यासाठी (WHO)जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार आसलेली आरोग्य दर्शक प्रश्नावलीचा वापर केला जाईल.

संख्याशास्त्रीय साधने

संकलित विश्लेषणासाठी मध्यमान,मध्यगा ,शेकडा प्रमाण, टी टेस्ट या संख्याशास्त्राचा उपयोग करण्यात येइल.

संदर्भ साहित्याचा आढावा

मुलांच्या कौटुंबिक आणि सामाजिक सहभाग

डायना, डी. (२००५) शाळेचे आणि समुदायाचे आरोग्य सुधारण्यासाठी शालेय आरोग्य सुधारणेचा कार्यक्रम राबविणे. २०२० सालापर्यत शाळेच्या मुलांचे आणि जगातील लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी जगातील वेगवेळ्या शाळेमधुन प्राथमिक, माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थाचे समावेश करण्यात आले. संशोधनाचे मुख्य उद्देश हा २०२० साला पर्यत निरोगी व सुदृढ जनसमुदाय तयार करणे हा आहे विद्यार्थाचे शालेय आरोग्य शिक्षण तसेच विविध कार्यक्रमाद्वारे विद्यार्थाच्या आरोग्य बाबतच्या समस्यांवर प्रतिबंध करणे, यामध्ये विविध क्षेत्रावर कार्य करण्यात आले. हेतुपुर्वक केलेली इजा, हिसा, आत्महत्या, तंबाखु चा वापर, दारु व्यसन आणि इतर औषधांचा वापर नको असलेली गर्भधारणा, एड्स आणि अयोग्य आहार नमुना आणि आपु-या प्रमाणातील शारीरिक हालचाल हे विशिष्ठ ध्येय प्राथमिक, माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थावर करण्यात आले. विद्यार्थामधुन योग्य समाजाची निर्मिती होते. संशोधन हे सर्वेक्षण पध्दतीने करण्यात आले. संशोधनाच्या निष्कर्षात असे आढळुन आले की, वरील घटक हे शाळेच्या मुलांचे आणि जगातील लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी पुरेसे नाही. त्यामुळे लैगिक आरोग्य व सुरक्षितता, मानसिक, भावनिक आरोग्य, दुखापत प्रतिबंध, मादक पदार्थाचे सेवन, व्यायाम आणि निरोगी खाद्य पदार्थाचे सेवन या घटकांचा समावेश करण्यात आला. हा सर्व कार्यक्रम राबवुन २०२० साला पर्यत निरोगी व सुदृढ जनसमुदाय तयार करण्यात मदत होईल. तसेच शालेय आरोग्य कार्यक्रमाद्वारे मुलांचे आरोग्य निरोगी व सुदृढ होवुन आजाराचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल.

२.२ **आरोग्य शिक्षण**

स्लेट, उ; आणि मारज्यु, ए. (१९९९). शाळेचे आरोग्य शिक्षण कार्यक्रम आणि शैक्षणिक यश संपादन . शाळेचे आरोग्य शिक्षण कार्यक्रमाद्वारे शैक्षणिक यशसंपादनाचे मोजमाप करुन विश्लेषण करणे शैक्षणिक कार्यक्रम अंमलबजावनीसाठी व यश संपादनासाठी शालेय आरोग्य

कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. सदर संशोधनाच उद्देश हा समन्वय शाळेमध्ये शाळेचे आरोग्य शिक्षण कार्यक्रमाद्वारे शैक्षणिक यशसंपादन करणे हा होता. सर्वेक्षण पध्दतीने सदर संशोधनाचे सर्वेक्षण करण्यात आले. सदर संशोधनामध्ये एकापेक्षा अनेक आरोग्य घटकांचा समावेश करण्यात आला. यामध्ये शालेय आरोग्य घटक, सामाजिक सेवा, आहार सेवा कर्मचारी वर्गासाठी आरोग्य बढती, कुटूंबाचा शाळेत सहभाग, सुदृढ आरोग्य पर्यावरण, शारीरिक शिक्षण आणि आरोग्य शिक्षण, या घटकांचा समावेश करण्यात आला. संशोधकाचे शास्त्रोक्त पध्दतीने वर्गीकरण करुन अभ्यास करण्यात आले. संशोधनाची माहीती गोळा करण्यासाठी वर्गीकरण केलेल्या हस्तपुस्तीका तयार करण्यात करण्यात आले. हे समुदायासाठी प्रतिबंधात्मक सेवा कार्य दलाने विकसित केलेल्या हस्तपुस्तकानुसार करण्यात आले. संशोधनाचे परिणाम शास्त्रोक्त पध्दतीने विश्लेषण केलेल्या पध्दतीमध्ये सकारत्मकदृष्ट्या परीणाम दिसुन आले.यामध्ये शैक्षणिक आरोग्य कार्यक्रम आणि कुटूंबाचा सहभाग यामध्ये सकारत्मकदृष्ट्या परीणाम दिसुन आले. तर काही घटकांमध्ये नकारात्मकदृष्ट्या परिणाम दिसुन आले.यामध्ये शारीरिक शिक्षण कार्यक्रम यांचे शैक्षणिक यशसंपादनावर नकारात्मक परीणाम दिसुन आले. तसेच आहार सेवा आणि मानसिक आरोग्य सेवा, कर्मचारीवर्गासाठी आरोग्य बढती कार्यक्रम, या घटकांचेही शाळेचे यश संपादन मदत करण्यासाठी मदत होते हे आढळून आले. निष्कर्ष शास्त्रीयदृष्ट्या वर्गीकरणामध्ये शाळेचे शिक्षण आरोग्य कार्यक्रम हे अतिशय आव्हानात्मक आहे संशोधनाची जनसख्या, पुरेशी विद्यार्थी संख्या,प्रत्येक विद्यार्थ्याना समान संधी, संशोधनासाठी लागणारा खर्च, आणि पुरेसा वेळ असणे आवश्यक आहे. शालेय आरोग्य शिक्षण कार्यक्रम राबवुन शाळेचे यश संपादन करण्यास मदत होईल.

आहार व शारीरिक हालचाल

काठे डब्यु.आणि सर्व. (२००९) यांनी केलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थावर वातावरणाचे परिणाम होऊन तीव्र स्वरुपाचे आजार आणि लठ्ठपणासारख्या आजाराच्या स्वाधीन असतात असे निदर्शनास आले. विद्यापीठाचे आरोग्य दर्शक हे पौष्टीक व शारीरिक हालचाल घटकाशी निगडीत असे सीडीसी ने के-१२ शालेय आरोग्य निर्देशांकाचे केंद्र, विद्यापीठ आरोग्य संघटना मुल्यमापण करण्यासाठी विकसित केले. आहार, शारीरिक हालचाल आणि वजन अशा अनेक कार्यक्रमामधुन विद्यापीठातील वैशिष्ट्ये ही जास्त मजबुत होण्यासाठी तसेच विद्यापीठातील विद्यार्थाच्या आरोग्याच्या सवयी ह्या वजन, आहार, आणि शारीरिक हालचाल सवयी यांचे संबंध पाहण्यात आले.सदर संशोधनाचा उद्देश हा विद्यापीठातील आरोग्य घटक वाढविणे आणि सुधारणा करणे सदर संशोधनासाठी अमेरीकेतील यादी प्रमाणे विद्यापीठांचा सहभाग करण्यात आला. त्यातील १३ विद्यापीठांचा सहभाग तथ्य संकलनासाठी करण्यात आला. (N=१९) असे एकुण ९.४६० विद्यार्थावर आरोग्य घटक राबविण्यात आले.संशोधनाचे विश्लेषण हे विद्यापीठ आरोग्य घटक व सीडीसी च्या घटका मधुन आलेल्या गुणांकावरुन करण्यात आले. तसेच NASA द्वारेही घेण्यात आले. यामध्ये शाकाहारी जेवन व फळ दिवसातुन किती वेळा घेता. आठवड्यातुन एरोबिक्स आणि ताकतीचे व्यायाम किती वेळा करता. शारीरिक हालचाल, व शरिर घटक रचना यावरील प्रश्न होते. निष्कर्षामध्ये विद्यापीठ आरोग्य घटकाचे गुण आणि शरीर घटक रचना यात कोणत्याही प्रकारचे संबंध आढळून आले नाही. आरोग्य घटकाचे वेगवेगळ्या शारीरिक हालचालीशी निगडीत करण्यात आले.(सहसंबंध=०.०२१,SE=०.०११ p=०.०६१) वैयक्तीक प्रश्न हे त्याच्या मनोरंजनात्मक खेळ, तंदुरुस्ती, आहार वजन, व्यवस्थापकाशी निगडीत होते. शारीरिक हालचालीचा संबंध हा आहार घटकापेक्षा सुधारलेला आढळून आला. विद्यापीठातील महाविद्यालयीन विद्यार्थाचे शालेय आरोग्य दर्शक आणि परिसरातील वातावरण आहार, शारीरिक हालचाल आणि वजन यावरील अभ्यास हा अतीशय अवघड आहे.विद्यापीठातील विद्यार्थाचे आरोग्य सुधारण्यासाठी तसेच विद्यार्थाची वागणुक, आहार, शारीरिक हालचाल आणि वजन नियंत्रणासाठी नेहमी उपयोग केला जाऊ शकतो.

स्वच्छता

जोसेफ रो (२००१) यांनी केलेल्या संशोधनाचे उदिष्टे हे शाळेचे वातावरण स्वच्छता आणि आरोग्य संबधी सुविधा उपलब्ध असलेल्या सुविधांची तुलना ही सरकारी आणि खाजगी शाळेतील सुविधांची तुलना करणे हा होता संशोधनाची पध्दत या कॉस विभागाचा अभ्यास फेब्रुवारी २०१० मध्ये दक्षिण भारतीय मंगलोर शहरामध्ये सदर संशोधन करण्यात आले संशोधन हे सर्वेक्षण पध्दतीचे होते संशोधनाचा निकाल या ३० शाळापैकी ४ सरकारी शाळा संशोधनासाठी घेण्यात आल्या तसेच १२ अनुदानित घेण्यात आणि १४ खाजगी शाळाचा सहभाग करण्यात आला संशोधनात असे निदर्शनास आले की २३ (७६.७ टक्के) मध्ये शाळेतील वातावरण योग्य नाही. त्यामध्ये विद्यार्थ्याना बसण्यासाठी व्यवस्थीत खुर्च्याची सोय नाही ११ (३६.७ टक्के) शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याचे शुध्दीकरण केले जाते. व शुध्दीकरण सुविधा आहे. ६ (२० टक्के) शांळामध्ये पाणी साठवुन ठेवण्याचे युनिट नेहमी स्वच्छ केले जात नाही सर्व सरकारी शाळा, खाजगी शाळा आणि अनुदानित शाळेमध्ये माध्यान्ह भोजनाच्या वेळी बसण्याची सुविधा नाहीत . स्वच्छता गृहाची सुविधा १० (३०.३ टक्के) शाळेमध्ये नाहीत आणि ८ (२६.७ टक्के)शाळेमध्ये मुला व मुलीसाठी वेगवेगळी स्वच्छतागृह नाहीत, ४ शाळेमध्ये वैद्यकिय तपासणी केली जात नाही, आणि १३ (४३.३ टक्के) शाळेमध्ये दररोज शिक्षकांमार्फत स्वच्छतेची तपासणी केली जात नाही. काही शाळेंमध्ये फक्त कर्मचारी वर्गासाठी तात्काळीन वैद्यकिय सुविधा आणि समुपदेशन उपक्रम पाहणी करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले होते. काही शाळेमध्ये लसीकरणाची वही ठेवण्यात आली होती, सर्व शाळेचे कार्यमानातील गुण एकत्र केल्यानंतर शाळांच्या सुविधामध्ये जास्त फरक आढळुन आला. निष्कर्ष शहरी भागातील शाळांमध्ये दुरुस्ती होणे गरजेचे आहे स्वच्छता आणि आरोग्य सुविधासंबंधी अनेक अत्यावश्यक गरजा कमी पडल्याचे आढळून आले.

सदर्भ

Center for disease control and prevention (२००५) cdc glossary for school health index factor From website ;

http://www.cdc.gov/healthyschools/shi/glossary.htm

http://www.cdc.gov/healthyschools/shi/index.htm

https://www.who.int/ncds/surveillance/gshs/en/

https://www.who.int/school_youth_health/gshi/en/

http://www.cdc.gov/HealthySchools/SHI/

गील,पी. प्रसाद, बी; श्रीवास्तव, आर. (१९६८) लखनऊ ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थाचा आहार दर्जा तपासणे .retrieved from july १३ २०१४,

http://link.springer.com/artical/१०.१००७%२FBF०२८१११६४#-१

सिन्हा, डी; गुप्ता, पी; वरेन,सी; असमा, एस. (२००४) शालेय सुविधांमुळे शालेय विद्यार्थामध्ये होणारा तंबाखुचा वापर व त्यांवर होणा-या परिणामाचा अभ्यास Retrieved from August १७ २०१४

http://www.ncbi.nlm.nih.gov/pubmed/१५७०९५९७.

जोसेफ, से. (२००१) शाळामध्ये पर्यावरण स्वच्छता आणि आरोग्य सुविधा एक महत्वाचे सार्वजनिक आरोग्य समस्या आहेत. Retrieved from August १९ २०१३,

http://www.atmph.org/artical.asp ?issn=१७५५-६७८३;=२००१.

हॉवेल, अ; आणि संड्रा, एल. (२०००). होर्डे आयलंडमधील प्राधमिक शाळांमधील निरोगी शालेय वातावरण तयार करण्यासाठी शालेय आरोग्य निर्देशांक तयार करणे. Retrieved from August १२, २०१३

www.http://scholar.lib.vt.edu

स्लेट, उ; आणि मारज्यु, ए. (२००७). शाळेचे आरोग्य शिक्षण कार्यक्रम आणि शैक्षणिक यश संपादन Retrieved from April ९ २०१४,
http://www.Schoolindia.org/article/snippets.htm(school!health)

उलो, हा; आणि ब्याली, ए. (२००७). समन्वयीत प्राथमिक शाळांमध्ये शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमाचा उपक्रम. Retrieved from march ३ २०१४,

www.http:/admin/Downloads/१२०६०५०८१००८७७.pdf(obisity)

संशोधक

आण्णा दिलीप मोहिते

मार्गदर्शक

डॉ.प्रदीप देशमुख